# दरपत्रक फॉर्म

***ग्रामिण पाणी पुरवठा विभाग***
***देखभाल व दुरुस्ती कक्ष.***
***सोलापूर जिल्हा परिषद.***

**निविदा सुचना क्रं देदूक-/ 07. - २०२४-२०२५**

## ***देखभाल दुरुस्ती कक्षाकरिता वाहन भाडयाने लावणेबाबत***

निविदा संदर्भ- **देदूक** - 07 /२०२४-२०२५

निविदा फॉर्म विक्रि सुरू दिनांक - 26.08.2024

निविदा फॉर्म विक्रिचा शेवटचा दिनांक - 02.09.2024

पुर्ण भरलेले निविदा फॉर्म जमा करण्याचा दिनांक - 03.09.2024 - दु.१४.०० वा.

निविदा उघडण्याचा दिनांक - 03.09.2024 - दु.१५.०० वा.

निविदा उघडण्याचे ठिकाण - कार्यकारी अभियंता.
ग्रा.पा.पु.जि.प.सोलापूर यांचे दालन

निविदा फॉर्मची किंमत - रु.५००/-

# दरपत्रके मागविणेकरिता सुचनापत्र

कार्यकारी अभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , जि.प.सोलापूर हे उप अभियंता (यां) , देखभाल दुरुस्ती कक्ष , जिल्हा परिषद सोलापूर या कार्यालयाकरीता एक वाहन (टाटा सुमो,बोलेरो,डिझायर, स्कार्पियो) भाडेतत्वावर लावणेकरिता टुरिस्ट व्यवसायधारक / वाहन पुरवठादार संस्था यांचेकडून सन २०२५-२६ साठी खाली नमूद केलेल्या कामाच्या सिलबंद दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने मागवित आहेत. दरपत्रके व अटी, शर्तींचा नमुना उप अभियंता (यां) , देखभाल दुरुस्ती कक्ष , जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडून दिनांकः-२६ /०८ / २०२५ ते ०२/०९ / २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व दिनांकः- ०३/०९ / २०२५ रोजी दुपारी १४.०० पर्यंत स्विकारल्या

जातील व शक्यतो त्याचदिवशी समोर हजर असणा-या कंत्राटदारांसमोर दरपत्रके उघडण्यात येतील.

टिप :- १.कोणतेही कारण न देता कोणतीही बाब किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षांकित अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

२. को-या दरपत्रके पोष्टाने मिळणार नाहीत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाज-पत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम रुपये | वाहन पुरवठा करणेचा कालावधी | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | देखभाल दुरुस्ती कक्ष् , जिल्हा परिषद सोलापूर या कार्यालयासाठी भाडेतत्वावर एक वाहन लावणेबाबत दरनिश्चिती करणे. २००० कि.मी.पर्यंत फिक्स रक्कम व त्यापुढील अंतरासाठी प्रती कि.मी.वेगळा दर याप्रमाणे निविदा भरावी. | ६,००,०००/- | ६,०००/- | पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष् | टुरिस्ट व्यवसायधाक / वाहन पुरवठादार संस्था |

उप अभियंता (यांत्रिकी)
देखभाल दुरुस्ती कक्ष
ग्रा. पा. पु. विभाग
जिल्हा परिषद, सोलापूर

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद सोलापूर

## इतर अटी व शर्ती

वाहन दर महिन्याला २००० कि.मी पर्यंत फिक्स दर राहील . वाहन २००० कि.मी. च्या पुढे वापरावयाचे झाल्यास आपण सादर केलेल्या दराप्रमाणे (म्हणजे २००० कि.मी.साठी) व त्यापुढील प्रत्येक कि.मी.साठी वरील नमूद दराप्रमाणे भाडे आकारणी करण्यात येईल व याबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार आपणास सुचना देण्यात येतील.

१) इंधन वंगण दुरुस्ती व वाहन चालकाचा खर्च (वेतन व भत्ते प्रवासभत्ते) असा वाहनावरील सर्व खर्च निविदाधारकास करावे लागेल त्याचबरोबर नियमित देखभाल दुरुस्तीचा खर्चही निविदाधारकानेच करावयाचा आहे.

२) वाहनाचा वापर ग्रामीण भागात कच्च्या रस्त्यावर व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कामासाठी करण्यात येईल.

३) निविदेच्या अटी व शर्ती पालन करणे बंधनकारक राहील याबाबत रक्कम रु.५०० च्या बॉन्डवर करारनामा करणे बंधनकारक राहील.

४) वाहन दुरुस्तीसाठी किंवा इतर कारणासाठी होणारी धाव संख्या जिल्हा परिषद कामकाजामध्ये समाविष्ट असणार नाही.

५) सदर भाड्याचे वाहन २४ तास कार्यालयाच्या अधिनस्त राहील.

६) वाहन वापराच्या कालावधीमध्ये झालेल्या अपघातास उप अभियंता (यां) , देखभाल व दुरुस्ती कक्ष तथा पूर्ण जिल्हा परिषद सोलापूर कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदार वाहनमालकाची राहील.

७) वाहन अनुउपलब्धतेबाबत किमान ३ दिवस अगोदर कार्यालयास लेखी सुचना देणे बंधनकारक राहील.विना लेखी सुचना वाहनाची उपलब्धता नसल्यास प्रति दिन रु.१०००/- दंड आकारण्यात येऊन तो देयकातूनच त्याच महिन्यात वसूल करण्यात येईल.

८) निवड झालेनंतर वाहनाचे रजिस्ट्रेशन पुस्तक, कर आकारणी पुस्तक , वाहनाचा विमा उतरविल्याची कागदपत्रे व वाहनचालकाचा वैध वाहन परवाना इत्यादि कागदपत्रांच्या स्वाक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील.

९) वाहनामध्ये आकस्मिक बिघाड झाल्याने वाहन उपलब्ध होऊ शकत नसेल अशावेळी जर कार्यालयास वाहनाची आवश्यकता असेल तर पर्यायी वाहन स्वखर्चाने उपलब्ध करून देणेची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१०) करार कालावधीमध्ये वाहनाच्या सुरक्षिततेची जबाबदारी पुर्णतः निविदाधारकाची राहील.

११) मुदतीच्या आत करार रद्द करावयाचा झाल्यास निविदाधारकाने किमान ४५ दिवस अगोदर पूर्व लेखी सुचना देणे बंधनकारक राहील.

## दरपत्रके सुचनापत्र

कामाचे नाव - उप अभियंता (यां) , देखभाल दुरुस्ती कक्ष , जिल्हा परिषद सोलापूर या कार्यालयासाठी भाडेतत्वावर एक वाहन लावणेबाबत दरनिश्चिती करणे.
(२००० कि.मी.पर्यंत फिक्स रक्कम व त्यापुढील अंतरासाठी प्रती कि.मी.वेगळा दर.)

१. अटी व शर्ती दरपत्रकासोबत खालील बाबी सादर करणे आवश्यक आहे.

२. मक्तेदारांनी दरपत्रके खालील प्रमाणे दोन लिफाफा (Two Envelope) मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्रं.१)**

१) बयाणा रक्कम व निविदेची फि रक्कम भरल्याची चलनाची प्रत / तितक्याच रकमेचा धनादेश / धनाकर्ष.
२) टुरिस्ट व्यवसायधारक / वाहन पुरवठादार संस्था असल्याचे प्रमाणपत्र
३) पॅन कार्डची झेरॉक्सप्रत.
४) पुरवठा करण्यात येणा-या वाहनाचे नोंदणी पुस्तक (आर.सी.बुक), कराधान पुस्तक, PUC प्रमाणपत्र, वाहन चालकाचा परवाना इ. च्या झेरॉक्स प्रती.
५) शा.नि.क्रसी.एस.टी/२०१८/प्र.क्रं.२७/इ.मा. २ मंत्रालय मुंबई दि.२८/११/२०१८ मधील परिशिष्ट-१ सोबत जोडलेले आहे. सदर नमुन्यानुसार रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर सत्य प्रतिज्ञापत्र (AFFIDAVIT)

**(ब) आर्थिक लिफाफा (लिफाफा क्रं.२)**

मक्तेदारानी आपले दर सोबत दिलेल्या अनुसुची **ब** मध्ये योग्य त्या जागी दर (सर्व करासह) भरुन सदरची अनुसुची **ब** लिफाफा क्र.२ मध्ये द्यावी. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या निविदेचे दर इतर कोठेही नमूद करण्यात येऊ नयेत.

२५)     **कामाची मुदत**:- पुरवठा आदेश मिळालेपासून एक वर्ष काम वाहन पुरवठा करणे आवश्यक आहे.

२६)     देयकायून सुरक्षा रक्कम आयकर जीएसटी व इतर सर्व करांची शासकीय नियमानुसार वजावट करून देयक अदा करण्यात येईल.

क)  **दरपत्रके सादर करणे**

उपरोक्तप्रमाणे नमूद दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करावी लागेल. दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ बंधनकारक राहील.मक्तेदारांनी विहित वेळेपुर्वी त्यांची निविदा सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**२८)**  लिफाफा क्रं.१ (तांत्रिक लिफाफा) शक्यतो दि.  /  / २०२५ रोजी दुपारी १७.०० वाजता कार्यकारी अभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांचे कार्यालयात उपस्थित मक्तेदार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येईल.

**२९)**  मक्तेदारांनी सादर केलेली दरपत्रकें व दरपत्रकातील दर लिफाफा क्रं.२ उघडलेनंतर ९० दिवसापर्यंत वैध राहतील.

**३०)**  मंजूर निविदाधारकाने सात दिवसात विहित नमुन्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे देयकातून शासकीय वा जिल्हा परिषदेच्या नियमाप्रमाणे आयकर , जीएसटी , सुरक्षा रक्कम , सेस इ.ची वजावट करण्यात येईल.

**३१)**  बयाणा रक्कम करारनामा कालावधी संपल्यावर परत करण्यात येईल.

**३२)**  दरपत्रकातील सर्व वा कोणत्याही अटी वा शर्ती पूर्ण न करणा-या मक्तेदाराच्या दरपत्रके वा अर्धवट सादर केलेल्या दरपत्रके अपात्र समजल्या जातील.

**३३)**  कोणत्याही अटीवर (Conditional) आधारित दरपत्रके स्वीकारल्या जाणार नाहीत अथवा स्वीकारल्या तरी मंजूर केल्या जाणार नाहीत.

**३४)**  दरपत्रका बाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना , शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती उप अभियंता (यां) , देखभाल दुरुस्ती कक्ष , जिल्हा परिषद सोलापूर या कार्यालयात उपलब्ध होईल.

**३५ )**  दरपत्रका बाबत शुध्दीपत्रक काढणेची गरज भासल्यास ते उप अभियंता (यां) , देखभाल दुरुस्ती कक्ष , जिल्हा परिषद सोलापूर या कार्यालयात उपलब्ध होईल.

**३६)**  दरपत्रकाच्या अटी शर्तींमध्ये बदल करणे, प्राप्त दरपत्रकापैकी एक किंवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

**३७)**  संक्षिप्त दरपत्रक सुचना व सविस्तर सुचना निविदा तंत्राचा एक भाग राहील.

१२) वाहन वापरात असताना जिल्हा अंतर्गत प्रवासात द्यावा लागणा-या टोल नाक्याची रक्कम पावती देयकासोबत सादर करावी लागेल.

१३) वाहन भाडेकरार एक वर्षाकरिता बंधनकारक असेल तसेच एक वर्षाची मुदतवाढ दिल्यास याच मंजूर दराने वाहन पुरवठा करावा लागेल. करारातील कोणत्याही अटींचा भंग झाल्यास करार कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

१४) कुठलेही कारण न देता एक महिना पूर्व सूचना देऊन वाहनासाठी केलेला करारनामा संपुष्टात आणण्याचा अधिकार उप अभियंता (यां) देखभाल दुरुस्ती कक्ष जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे राखून ठेवलेला आहे.

१५) वाहन २४ तास कार्यालयासाठी असेल.त्यासाठी चालकाला कुठला अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

१६) वाहन मालकाने प्रतिष्ठित विमा कंपनीकडून वाहनाची (वाहन व प्रवासी यासह) विमापालिसी काढलेली असावी.

१७) दर हे एक वर्ष कालावधीकरिता कायम राहतील.इंधन दरात बदल झाला तरी कोणतीही दर वाढ मिळणार नाही . तसेच संभाव्य जी.एस.टी कपातीचा विचार करून निविदेमध्ये दर सादर करणेत यावेत.

१८) वाहनासाठी तपशीलवार माहिती असणारे लागबुक ठेवावे.वेळच्यावेळी लॉगबुक भरून कार्यालयीन प्रमुखाची स्वाक्षरी घ्यावे लागेल.

१९) वेळप्रसंगी शासकीय सुट्टीतही सासकीय कामासाठी वाहनाचा वापर होऊ शकतो.

२०) कामकाजाचे कार्यक्षेत्र संपूर्ण सोलापूर जिल्हा आहे. तसेच शासकीय कामासाठी अन्य जिल्ह्यातही दौरा होऊ शकतो.

२१) शासकीय दौ-यावेळी बाहेर मुक्काम होऊ शकतो , बाहेर मुक्कामी असताना वेगळा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

२२) निधी उपलब्धतेनुसार देयक अदा केले जाईल.

२३) आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करण्यास तांत्रिक अडचणी असल्यास त्याबाबत निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेबाबत अंतिम निर्णय मा. कार्यकारी अभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , जिल्हा परिषद सोलापूर यांचा राहील.

२४) निविदा / दर मंजुर झाल्याचे कळविलेनंतर निविदा प्रक्रियेतील कमीत कमी मंजूर दरानुसार कामे करण्यास / पुरवठा करण्यास तयार असल्याचे संमती पत्र , रु.१००/- किंमतीच्या स्टंम पेपरवर वाहन पुरवठा करण्यास तयार असल्याबाबत जिल्हास्तरावर करारनामा करुन ७ दिवसाच्या आत द्यावा लागेल.

**३८)** कोणत्याही बाबीसाठी काही [illegible] झाल्यास त्याबाबत नायालयात जाता येणार नाही. दिनांक

३९) दिनांक :- ०१ जुलै २०१७ पासून जीएसटी (GST) या नव्या कर रचनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली असल्याने जीएसटी (GST) कराच्या परिणामस्वरुप लागु होणाऱ्या अतिरिक्त कराच्या बोजाच्या विचार करुन निविदा सादर करण्याची दक्षता घ्यावी, तदनंतर कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उप अभियंता (यांत्रिकी)
देखभाल दुरुस्ती कक्ष
ग्रा. पा. पु. विभाग
जिल्हा परिषद, सोलापूर

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद सोलापूर**

कंत्राटदारांची **शिक्का व सही.**

शा. नि. क्रं. सीएटी/२०१८/प्र.क्रं.१२७/इमा-२/मंत्रालय मुंबई दि. २८/११/२०१८

## परिशिष्ट - १

**(१) मराठी**

**नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु.५०० च्या स्टॅम्प पेपरवर)**

## सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी---------------------------------------------------वय वर्षे----------------राहणार------- ----------या सत्यप्रतिज्ञा पत्राव्दारे लिहुन देतो की, मी ---------------------------------------------- -------- या फर्मचा / कंपनीचा मालक असुन ---------------------------------------- या कामासाठी निविदा सादर कारीत आहे. त्या निविदेच्या लिफाफा क्रं. १ मध्ये जी कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी, बरोबर व पुर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असुन असे शपथपूर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपुर्ण माहीती आढळल्यास मी भारतीय दंडसंहीता अंर्तगत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१) जर कंत्राट कालावधीदरम्यान, मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचाऱ्यांनी निविदेमध्ये विभागाल कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी / बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहीत अंर्तगत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

२) जर कंत्राट कालावधीदरम्यान आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही कागदपत्रे खोटी / बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहीत अंर्तगत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

३) जर काम समाप्ती नंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहीता अंर्तगत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

**कंत्राटदाराची सही / शिक्का**

## अनुसुची ब-१

**कामाचे नाव** - जिल्हा परिषद सोलापूर येथील देखभाल व दुरुस्ती कक्षाकरिता एक वाहन भाडे तत्वावर लावणेबाबत.

| अ.क्र | प्रमाण | एकक | कामाचा तपशील | दर र.र. | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी | अक्षरी |
| १ | २००० | कि.मी | २००० कि.मी अंतरापर्यंत (प्रति माह GST सह ) | | |
| २ | १ | कि.मी | २००० कि.मी पुढील अंतरासाठी प्रती कि.मी वेगळा दर याप्रमाणे (GST सह) | | |